सहायक महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी संवर्गातून नायब तहसीलदार संवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात नियमित व तदर्थ पदोन्नती देणेबाबत (कोकण विभाग)..

**महाराष्ट्र शासन**
**महसूल विभाग**
**शासन आदेश क्रमांकः R&FD-१५०७१/२७/२०२६-MRF(DESKE९)**
**( E-१६२२५३९)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ०७.१०.२०२६

**वाचा :-**

विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे पत्र क्र.मशा/आस्था/इएसबी/स.म.अ./मं.अ.पदोन्नती/ २०२५-२६ दि.१८.०३.२०२६

**शासन आदेश:-**

कोकण विभागातील सहायक महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी संवर्गातील खालील तक्त्यात नमूद कर्मचाऱ्यांना नायब तहसीलदार (गट -ब, राजपत्रित) या संवर्गात सन २०२५-२६ या निवडसूची वर्षातून नायब तहसीलदार संवर्गातील नियमित पदोन्नती कोट्यात रिक्त पदांवर खुल्या प्रवर्गात परिच्छेद क्र.३ येथील अटींच्या अधीन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती देण्यात येत आहे.

**अ) नियमित पदोन्नती :**

**१) सहायक महसूल अधिकारी :-**

| अ. क्र. | ज्येष्ठता क्रमांक | कर्मचाऱ्याचे नाव | पात्रता |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | १९९ | श्रीम.प्रिया कांबळे | सेवाज्येष्ठतेनुसार नियमित पदोन्नतीस पात्र |
| २ | २०० | श्रीम.योगिता पाटील | सेवाज्येष्ठतेनुसार नियमित पदोन्नतीस पात्र |
| ३ | २०१ | श्रीम.स्मिता मोकल | सेवाज्येष्ठतेनुसार नियमित पदोन्नतीस पात्र |
| ४ | २०२ | श्रीम.प्रिती पाटील | सेवाज्येष्ठतेनुसार नियमित पदोन्नतीस पात्र |
| ५ | २०३ | श्री.अमोल बंदरी | सेवाज्येष्ठतेनुसार नियमित पदोन्नतीस पात्र |
| ६ | २४० | श्रीम.दर्शना सरपाटील | सेवाज्येष्ठतेनुसार नियमित पदोन्नतीस पात्र |
| ७ | २०५ | श्रीम.सारिका परकर | सेवाज्येष्ठतेनुसार नियमित पदोन्नतीस पात्र |
| ८ | २०६ | श्रीम.वैशाली बागुल | सेवाज्येष्ठतेनुसार नियमित पदोन्नतीस पात्र |

२) मंडळ अधिकारी:-

| अ. क्र. | ज्येष्ठता क्रमांक | कर्मचाऱ्याचे नाव | पात्रता |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | ६२ | श्री.दिपक अहिरे | सेवाज्येष्ठतेनुसार नियमित पदोन्नतीस पात्र |
| २ | १०९ | श्री.सचिन वाघ | सेवाज्येष्ठतेनुसार नियमित पदोन्नतीस पात्र |
| ३ | १११ | श्री.राजाराम घुले | सेवाज्येष्ठतेनुसार नियमित पदोन्नतीस पात्र |
| ४ | ११२ | श्रीम.सुजाता काळे | सेवाज्येष्ठतेनुसार नियमित पदोन्नतीस पात्र |
| ५ | ११५ | श्रीम.सुषमा कुर्ले | सेवाज्येष्ठतेनुसार नियमित पदोन्नतीस पात्र |

आ) तदर्थ पदोन्नती

१) सहायक महसूल अधिकारी:-

| अ. क्र. | ज्येष्ठता क्रमांक | कर्मचाऱ्याचे नाव | पात्रता |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | २०७ | श्रीम.सरोज पोरे | सेवाज्येष्ठतेनुसार तदर्थ पदोन्नतीस पात्र |
| २ | २०८ | श्री.सचिन कचरे | सेवाज्येष्ठतेनुसार तदर्थ पदोन्नतीस पात्र |
| ३ | २१० | श्री.महेश सप्रे | सेवाज्येष्ठतेनुसार तदर्थ पदोन्नतीस पात्र |
| ४ | २१९ | श्री.नंदकिशोर कदम | सेवाज्येष्ठतेनुसार तदर्थ पदोन्नतीस पात्र |
| ५ | २२० | श्री.मंदार दिक्षीत | सेवाज्येष्ठतेनुसार तदर्थ पदोन्नतीस पात्र |
| ६ | २२१ | श्री.राजेश यादव | सेवाज्येष्ठतेनुसार तदर्थ पदोन्नतीस पात्र |
| ७ | २२२ | श्रीम.वंदना शिर्के | सेवाज्येष्ठतेनुसार तदर्थ पदोन्नतीस पात्र |
| ८ | २२३ | श्री.पंकज मोंडकर | सेवाज्येष्ठतेनुसार तदर्थ पदोन्नतीस पात्र |
| ९ | १५८ | श्रीम. उषा भोये | दि.२५/०५/२००४ स्थित सेवा ज्येष्ठतेनुसार तदर्थ पदोन्नतीस पात्र |

२) मंडळ अधिकारी:-

| अ. क्र. | ज्येष्ठता क्रमांक | कर्मचाऱ्याचे नाव | पात्रता |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | ११६ | श्री.हेमंत वरळीकर | सेवाज्येष्ठतेनुसार तदर्थ पदोन्नतीस पात्र |
| २ | ११७ | श्री.सतिश भागवत | सेवाज्येष्ठतेनुसार तदर्थ पदोन्नतीस पात्र |
| ३ | ११८ | श्री. एन. एस. मयेकर | सेवाज्येष्ठतेनुसार तदर्थ पदोन्नतीस पात्र |
| ४ | ११९ | श्री. एम. जी. गवस | सेवाज्येष्ठतेनुसार तदर्थ पदोन्नतीस पात्र |

उक्त पदोन्नत अधिका-यांच्या पदस्थापनेचे आदेश स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येतील.

३. उक्त कर्मचाऱ्यांना पदोन्नती कोट्यात रिक्त झालेल्या पदांवर पदोन्नती खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे:-

१) सहायक महसूल अधिकारी तसेच मंडळ अधिकारी संवर्गातून नायब तहसीलदार संवर्गातील पदोन्नतीकरिता निम्न संवर्गाच्या दिनांक ४.९.२०२५ रोजीच्या ज्ञापनाद्वारे प्रसिद्ध करण्यात आलेल्या दिनांक १.१.२०२५ रोजीच्या अंतिम जेष्ठतासूचीस कोणत्याही न्यायालयात स्थगिती देण्यात आलेली नाही या अटीच्या अधीन राहून सदर पदोन्नती देण्यात येत आहे.

२) निवडसूची तयार करताना कोणीही ज्येष्ठ कर्मचारी अनवधानाने वगळण्यात आलेले नाही अथवा अधिक्रमित झालेले नाहीत.

२) मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधीन राहून पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ स्थित सेवाज्येष्ठतेनुसार, निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात भरण्याबाबत सा.प्र.वि./१६-ब कार्यासनाच्या दि.०७.०५.२०२१ च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या सूचनांनुसार सदर मान्यता देण्यात येत आहे. तसेच दि.०७.०५.२०२१ च्या शासन निर्णयाप्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे आव्हान देण्यात आलेले असून, त्यावरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून सदर पदोन्नती देण्यात येत आहे.

३) मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र.३७९२/२०२५ व ८८९०/२०२६ अंतिम निर्णयाच्या अधीन राहून सदर पदोन्नती देण्यात येत आहे.

५) सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी निवडसूचीतील अधिकाऱ्यांना नियमितपणाचा कोणताही हक्क असणार नाही.

६) सदर निवडसूचीतील सेवाज्येष्ठतेनुसार पात्र असलेल्या, तथापि पदोन्नती नाकारलेल्या, अधिकाऱ्यांच्या पदोन्नती संदर्भात सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१२.०९.२०१६ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्याची विभागीय आयुक्त, कोकण यांनी दक्षता घ्यावी.

६) सदर निवडसूचीस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता घेण्याची दक्षता विभागीय आयुक्त, कोकण यांनी घ्यावी.

७) नायब तहसीलदार या संवर्गात पदोन्नती देण्यात येत असलेले वरील अधिकारी पदस्थापनेनंतर प्रत्यक्ष रूजू झाल्याखेरीज त्यांना पदोन्नतीच्या संवर्गाच्या वेतनाचे लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.

८) भविष्यात न्यायालयीन अथवा पदोन्नतीच्या अनुषंगाने इतर काही आक्षेप निघाल्यास याची संपूर्ण जबाबदारी विभागीय आयुक्त, कोकण विभाग या कार्यालयाची राहील.

४. मंडळ अधिकारी संवर्गातून पदोन्नत श्री.दिपक अहिरे (ज्येष्ठता क्रमांक ६२) यांना सेवाकनिष्ठ अधिकारी श्री.के.एस. देऊळगावकर यांना सन २०२४-२५ च्या निवडसूची अंतर्गत देण्यात आलेली तदर्थ पदोन्नती सन २०२५-२६ या निवडसूची वर्षात नियमित करण्यात आली असून श्री.दिपक अहिरे यांचे पदोन्नतीनंतरचे स्थान श्री.के.एस. देऊळगावकर यांच्यापेक्षा वरिष्ठ म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

५. सदर आदेश सामान्य प्रशासन विभागाने दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

६.	सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६१००७१९०५३९५३४८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

MAHESH ASHOKRAO
VARUDKAR

Digitally signed by MAHESH ASHOKRAO VARUDKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT,
2.5.4.20=D93C4961D98086877A4048296211D7AF97ECFD40D7967C43D20B360D83CE0FA6,
postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=7EBBBC3712E8D459EF90BF7AAE4EA46E9CAEBDD50CFECDE2EE7CE0454FA0416A,
cn=MAHESH ASHOKRAO VARUDKAR
Date: 2026.10.07 19:06:26 +05'30'

**(महेश वरूडकर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

विभागीय आयुक्त, कोकण विभाग.

प्रत,

१)	मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२)	मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास/गृहनिर्माण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३)	मा.उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क/क्रीडा व युवक कल्याण/ अल्पसंख्याक विकास आणि औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
४)	मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
५)	मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
६)	संबंधित जिल्हाधिकारी.
७)	प्रधान महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परीक्षा), मुंबई/ नागपूर.
८)	संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
९)	संबंधित अधिदान व लेखा अधिकारी.
१०)	संबंधित आहरण व संवितरण अधिकारी.
११)	अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई-३२.
१२)	संबंधित नायब तहसीलदार (संबंधित विभागीय आयुक्त यांचेमार्फत).
१३)	उप सचिव (आस्था-९) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
१४)	सह सचिव (कार्यासन-१२/सेवा-२), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई
१५)	निवड नस्ती (कार्यासन आस्था-९), महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.